आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**

## आदिवासी विकास विभाग

अर्जदाराचा नजिकच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो

**सांकेतांक क्रमांक**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**अर्ज क्र. ......**

**प्रति,**

उपप्रादेशिक व्यवस्थापक,
आदिवासी विकास महामंडळ,
--------------------------

**प्रादेशिक कार्यालय -------------------**

### खावटी कर्ज योजना

### कर्जरोखा

कर्जरोखा लिहून घेणार ...............................................................................
कर्जरोखा लिहून देणार ...............................................................................
रा. .......................... ता. ....................... जि. ........................................

कारणे कर्ज रोखा लिहून देतो की, मी चालू वर्षी आदिवासी विकास महामंडळाचे खावटी कर्ज मिळणेबाबत आपल्या सोसयटीकडे अर्ज केला असून अर्जातील मजकूर बरोबर आहे. सदरच्या कर्जाबाबत खालील अटी मला मान्य आहेत. मला एकुण कर्ज रु. .................... मालाच्या / रक्कमेच्या रुपाने मंजूर झालेले आहे. जसे कर्ज मिळेल तसतशा पावत्या देण्यात येतील.

१) सदरचे कर्ज अल्प मुदतीचे असुन चालू खरीप हंगामातील पीक निघाल्यावर त्याची परतफेड करावयाची आहे.

२) मला याची जाणीव करुन देण्यात आली आहे की, या खावटी कर्जाची परतफेड माझ्या शेतीच्या अगर जंगल उत्पादनाच्या संपूर्ण मालाची विक्री मी आदिवासी विकास महामंडळाला करुन त्यातून करावयाची आहे. सोसायटीच्या परवानगीशिवाय माझ्या शेती अगर जंगल मालाची विल्हेवाट लावणार नाही. मी माझ्या या खावटी कर्जाची अशा रितीने दिनांक ..................... पूर्वीच परतफेड करावयाची आहे. एकाधिकार किंवा ऐच्छिक खरेदी योजनेत माझा शेती उत्पादित माल अगर जंगल उत्पादित माल मी स्वतः माझे नावावर आणेन हे माझ्यावर बंधनकारक राहील जर काही अटळ कारणामुळे तो माल घेऊन मी केंद्रावर पाठवीन त्या मोबदल्यातून या कर्जाची फेड करण्यास माझी पूर्ण संमती आहे.

३) सदर कर्जाचा गैरवापर करणार नाही.

४) सदर कर्जावर शेकडा ७.५ टक्के अगर वेळोवेळी सोसायटी व महामंडळ ठरवील त्या दराने व्याज आकारण्यात येईल.

५) सोसायटी व महामंडळ ठरवील त्याप्रमाणे सदरचे कर्ज रोख अगर इतर माल रुपाने देण्यात येईल त्यास माझी संमती आहे.

६) सदर कर्जाची परतफेड मी अगर माझ्या कुटुंबातील जो कोणी रोजगार हमी योजनेच्या कामावर अगर शासनाच्या कोणत्याही कामावर अथवा इतर कोणत्याही कामावर रोजंदारीवर काम करतील त्याबद्दल मिळणा-या मजुरीतून परतफेड करुन देऊ त्याबद्दल

कोणतीही सबब अगर तक्रार सांगणार नाही.

७) मला धान्य रुपाने जे कर्ज मंजूर झाले त्यापोटी मिळणारा माल सुस्थितीत आहे याची मी खात्री करुन माल घेत आहे.

८) सदर कर्जाला तारण म्हणून माझी स्थावर जंगम मालमत्ता, शेतीमधून निघणारे पीक, वनउत्पादन मजुरी / इ.कर्जाचा बोजा राहील व संस्थेच्या परवानगीशिवाय या मालाची व मालमत्तेची मी विल्हेवाट लावणार नाही.

९) वरीलप्रमाणे अटी मला वाचून दाखविल्या आहेत त्या मला मान्य असून त्याबद्दल हा कर्जरोखा स्वखुशीने लिहुन दिला आहे. या सर्व अटी मला मान्य असून त्यातील अटींचे उल्लंघन झाल्यास या कर्जाची फेड मी दंड व्याजासह सुध्दा करीन.

दिनांक :    /    / २००

साक्षीदार

१) --------------------------------

२) --------------------------------

कर्जदाराची सही / अंगठा

टीप : कर्जदार सभासदाच्या वरील कर्जाची परतफेड हमी देत असून कर्जदाराने सदर कर्जाची वेळेवर फेड न केल्यास सदर कर्जाची जबाबदारी आम्ही स्वीकारत आहोत.

जामीनदार

१) -------------------------------- सही

२) -------------------------------- सही